**ठळक बातम्या**

- गेल्या दहा वर्षात आसाममधले दहा हजारपेक्षा जास्त युवक शस्त्र त्याग करुन मुख्य प्रवाहात आले असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्रसारण सेवा  वि-नियमन विधेयक संसदेत लौकर सादर करण्याच्या दृष्टीनं एक कालमर्यादा निश्चित करण्याची संसदीय समितीची  शिफारस

- मतदार यादीत फेरफार झाल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त येत्या मंगळवारी  बैठक घेणार

- अंतराळात अडकलेले नासाचे वैज्ञानिक सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना परत आणण्यासाठी ‘ड्रॅगन अंतराळ यान’ रवाना

**आणि**

- देशाच्या उत्तर भागात हिमवृष्टी आणि पावसामुळे पारा घसरला, तर महाराष्ट्रात तापमानात वाढ.

**<><><><><>**

गेल्या दहा वर्षात आसाममधले दहा हजारपेक्षा जास्त युवक शस्त्र टाकून मुख्य प्रवाहात आले असून आसाम प्रगतीपथावर आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलं. गोलघाट जिल्ह्यातल्या डेरगाव इथल्या पोलीस अकॅडमीच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन आज अमित शाह यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. पुढच्या टप्प्याची पायाभरणीही त्यांनी यावेळी केली. ही अकॅडमी देशातली सर्वश्रेष्ठ अकॅडमी

होईल असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला. रालोआ सरकारने आसाममधे शांतता प्रस्थापित केली असून इथं उद्योगधंदे उभे राहत आहेत, असं शाह म्हणाले. ३ लाख कोटी  रुपयांचे प्रकल्प आसाम मधे येणार आहेत, यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होतील असंही शाह म्हणाले.
लचित बारफुकन पोलीस अकॅडमीत अत्याधुनिक सुविधा दिल्याबद्दल पोलीस महासंचालक हरमीत सिंग यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांचे आभार मानले. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा  आणि केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यावेळी उपस्थित होते.

३४० एकर वर पसरलेली, ही अकॅडमी उभारण्यासाठी १ हजार २४ कोटी खर्च येणार आहे. प्रशिक्षणार्थींना सैद्धांतिक आणि व्यावहारिक अशा दोन्ही बाबींचं ज्ञान मिळावं यासाठी या अकॅडमीची रचना करण्यात आल्याचं इथल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रसारण सेवा  वि-नियमन विधेयक संसदेत सादर करण्यासाठी एक कालमर्यादा निश्चित करण्याची शिफारस संसदीय समितीने सरकारला  केली आहे. या विधेयकातल्या काही तरतुदींना विरोध झाल्यामुळे याला गेल्यावर्षी स्थगिती दिली होती. भाजपा खासदार निशिकांत दुबे यांच्या अध्यक्षतेखालच्या दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञानविषयक स्थायी समितीने ही सूचना दिली आहे. या क्षेत्रातील तज्ज्ञांशी सल्लामसलत केल्यानंतर  विधेयकाचा अंतिम मसुदा तयार केला जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं १७ जानेवारी रोजी समितीला कळवलं होतं.

**<><><><><>**

मतदार यादीत फेरफार झाल्याच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी येत्या मंगळवारी एक बैठक बोलावली आहे. या बैठकीत केंद्रीय गृह सचिव, विधिमंडळ सचिव, तसंच आधार प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत मतदार ओळखपत्र आधार ओळखपत्राला जोडण्याबाबतच्या मुद्द्यावर विस्तृत चर्चा होईल. मतदार यादी आधार ओळखपत्रांना ऐच्छिकरीत्या  जोडण्याची तरतूद या संदर्भातल्या कायद्यात आहे.

**<><><><><>**

ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देण्यासाठी तसंच त्यांची दिशाभूल होऊ नये म्हणून केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ग्राहक व्यवहार मंत्री  प्रल्हाद जोशी यांनी म्हटलं आहे जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आयोजित एका वेबिनारला ते संबोधित करत होते. ग्राहकांचं केवळ संरक्षणच नव्हे तर ग्राहकांची समृद्धी हे देखील सरकारचं उद्दिष्ट आहे असं ते म्हणाले.

जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत.  ग्राहकांच्या हक्काचं रक्षण आणि इतर बाबींबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशानं विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. ग्राहकांनी शाश्वत जीवनशैली स्वीकारून न्याय्य पध्दतीनं वाटचाल करण्याला प्रोत्साहन द्यावं, अशी आजच्या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. केंद्र सरकारच्या वतीनं 'जागो ग्राहक जागो' हा उपक्रम राबवला जातो. ई-कॉमर्समधला अनुचित व्यापार टाळण्यासाठी, ग्राहक व्यवहार विभागाने ग्राहक संरक्षण (ई-कॉमर्स) नियम, २०२०अधिसूचित केले आहेत. या

नियमांद्वारे ई-कॉमर्स कंपन्यांची दायित्व, रूपरेषा आणि बाजारपेठेतलं त्यांचं अस्तित्व याबाबत नियमावली तयार करण्यात आली आहे.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी आकाशवाणी वर ‘मन-की-बात’ कार्यक्रमाच्या माध्यमातून देश-विदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सादर होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग असेल. नागरिकांनी त्यांचे विचार आणि सूचना येत्या २८ मार्च पर्यंत १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकाद्वारे पाठवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, तसंच प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब चॅनल वरून मन-की-बात या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण होणार असून त्यानंतर लगेचच विविध प्रादेशिक भाषांमधून या कार्यक्रमाचा अनुवाद प्रसारित करण्यात येईल.

**<><><><>**

वेव्हज् अर्थात जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद १ मे पासून मुंबई इथं सुरू होत आहे. विविध क्षेत्रातल्या तज्ज्ञांना एकाच व्यासपीठावर येण्याची संधी वेव्हज् उपलब्ध करून देणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत माध्यम आणि मनोरंजन क्षेत्रात आपली ओळख निर्माण करत आहे. याच प्रयत्नांचा भाग म्हणून वेव्हजचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><>**

गेल्या एक वर्षापासून अंतराळात अडकलेले नासाचे वैज्ञानिक सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांना परत आणण्यासाठी ड्रॅगन अंतराळ यान

घेऊन जाणारं फाल्कन ९ रॉकेट काल संध्याकाळी अंतराळात रवाना झालं. नासा आणि स्पेसएक्सच्या क्रू १० मिशन अंतर्गत हे यान काल अंतराळात निघालं.  सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर गेल्या वर्षी जून महिन्यात आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात गेले होेते, मात्र अंतराळ यानात तांत्रिक बिघाड झाल्यानं त्यांना परतता आलं नाही. त्यांना परत आणण्यासाठी नासा प्रयत्न करत आहे. सर्व काही ठरल्याप्रमाणे झालं तर सुनिता विल्यम्स, बुच विल्मोर १९ मार्चला पृथ्वीवर परततील, असं नासानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं एल एम व्ही थ्री या आपल्या सहाव्या मोहिमेतल्या क्रायोजेनिक इंजिनची आज यशस्वी चाचणी केली. तामिळनाडूमध्ये महेंद्रगिरी इथल्या इसरो प्रॉपल्शन संकुलात ही चाचणी झाली. एल एम व्ही थ्री हे इसरोनं विकसित केलेलं तीन टप्प्यातलं मध्यम लिफ्ट प्रक्षेपण वाहन आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानात जफर एक्सप्रेसवर हल्ला करून अपहरण केलेल्या सर्व २१४ ओलिसांची हत्या केल्याचा दावा बलोचिस्तान लिबरेशन आर्मीनं केला आहे. ओलीस आणि कैद्यांच्या सुटकेसाठी दिलेली ४८ तासांची मुदत पाकिस्ताननं पाळला नाही असा दावा संघटनेचे प्रवक्ते जीयांद बलोच यांनी केला आहे. बलोचिस्तान लिबरेशन आर्मीनं कायमच आंतरराष्ट्रीय कायद्याचं पालन केल्याचा, मात्र पाकिस्तानच्या हटवादी भूमिकेमुळं ओलिसांची हत्या केल्याचा दावाही त्यांनी केला आहे. यापूर्वी, या घटनेत अपहरण झालेल्या

किमान ३४६ ओलिसांची सुटका केल्याचा आणि सर्व ३३ हल्लेखोरांना ठार केल्याचा दावा पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांनी केला होता.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये रायपूर इथे झालेल्या आंतरराष्ट्रीय मास्टर्स लीग स्पर्धेच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात वेस्ट इंडीज मास्टर्सनी श्रीलंका मास्टर्सवर सहा धावांनी विजय मिळवला. उद्या याच मैदानावर होणाऱ्या अंतिम सामन्यात वेस्ट इंडीज मास्टर्सची लढत सचिन तेंडुलकरच्या नेतृत्वाखालच्या इंडिया मास्टर्सबरोबर होणार आहे.

**<><><><><>**

मुंबईत सीमाशुल्क विभागाने दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये सोन्याची तस्करी करणाऱ्या चौघांना अटक केली असून त्यांच्याकडून तस्करीचं साडेतीन कोटीपेक्षा जास्त किंमतीचं सोनं जप्त केलं आहे. सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी रात्री संशयावरून एकाला ताब्यात घेतलं आणि त्याची झडती घेतली असता सोन्याची भुकटी असलेली पाकिटं त्याच्याकडे सापडली. त्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी इतर दोघांनाही अटक केली आणि त्यांच्याकडून सोनं जप्त केलं.

**<><><><><>**

देशाच्या उत्तर भागात हिमवृष्टी आणि पावसामुळे तापमापकातला पारा घसरला आहे तर महाराष्ट्रात तापमानानं उच्चांक गाठला आहे.

जम्मू-काश्मीरच्या खोऱ्यात काल संध्याकाळपासून पाऊस आणि हिमवृष्टी होत असून हवामान खात्यानं ‘येलो अलर्ट’ जारी केला आहे. पुढच्या काही दिवसात अनेक भागात अधूनमधून पाऊस आणि हिमवृष्टी होईल.

सोमवार पासून खोऱ्यातलं हवामान स्थिर होणार असून येत्या २४ मार्च पर्यंत परिसरातलं हवामान कोरडं राहील, असा हवामान खात्याचा अंदाज आहे. श्रीनगर  मध्ये देखील आज हिमवृष्टी होणार असून काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल तर उद्यापासून हवामानात सुधारणा होईल, असा अंदाज आहे. राजस्थान राज्यातल्या १२ जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह वीज कोसळण्याचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. राज्यातल्या अनेक जिल्ह्यात कालपासून गारपीट होत असून आज देखील अनेक जिल्ह्यात जोरदार पाऊस पडेल आणि  नऊ जिल्ह्यांमध्ये वादळ सदृश्य परिस्थिती असेल, असा अंदाज आहे.

पश्चिम बंगाल मध्ये येत्या १८ मार्च पर्यंत उष्णतेची लाट असेल तर दक्षिण आणि पश्चिम भागातल्या काही जिल्ह्यांमध्ये हवामान कोरडं राहील, असा अंदाज आहे. महाराष्ट्र राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून येत आहे. विदर्भातील अनेक जिल्ह्यात काल पारा ३९ ते ४० अंशांच्या आसपास होता; सोलापुरातही काल तापमान ४१ अंश सेल्सियसपर्यंत नोंदवलं गेल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. आज विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**